धडा पाठ 4

सभेची तयारी

बोराडे : नमस्कार बाईसाहेब.

बंसल : नमस्कार बोराडे साहेब. या बसा. तो अहवाल तयार आहे का? मला तो आजच हवा आहे.

बोराडे : बाईसाहेब, हा भाषेबद्दलचा अहवाल. तुम्हाला हाच हवा आहे ना?

बंसल : हो. हाच हवा आहे मला. आता जरा तो अहवाल त्या बाजूला ठेवा.

बोराडे : तुम्हाला आणखी काही हवं आहे का? मी आता काय करु?

बंसल : तुम्ही वीस तारखेला नेहमीची त्रैमासिक सभा बोलवा. सर्व कर्मचाऱ्यांना एकत्र जमवा. तिथं आपण या अहवालावर चर्चा करुया. सर्वांची मतं घेऊया. त्याप्रमाणं अहवालात आवश्यक बदल करूया.

बोराडे : ठीक आहे बाईसाहेब. मी आता जाऊ का?

बंसल : हो!

बोराडे : शिंदे!

शिंदे : काय साहेब?

बोराडे : ती फाईल आणा बरं!

शिंदे : कोणती फाईल?

बोराडे : उत्तर प्रदेश सरकारची. भारतीय भाषा शिक्षणाबाबतची.

शिंदे : ती माझ्याजवळ नाही.

बोराडे : मग कोणाकडं आहे?

शिंदे : कुळकर्णीजवळ.

बोराडे : ठीक आहे. तुम्ही जरा माझ्या खोलीत या. इकडे तिकडे जाऊ नका.

बैठक की तैयारी

बोराडे : नमस्कार बहनजी.

बंसल : नमस्कार बोराडे साहब। आइए, बैठिए। क्या वह रिपोर्ट तैयार है? मुझे वह आज ही चाहिए।

बोरडे : बहनजी, यह रही भाषा संबधी रिपोर्ट। आपको यही चाहिए न?

बंसल : हाँ! यही चाहिए मुझे। अभी तो वह रिपोर्ट उस तरफ रखो।

बोराडे : आप को कुछ और चाहिए क्या? अब मैं क्या करूँ?

बंसल : आप बीस तारीख को नियमित बैठक बुलाइए। सारे कर्मचारियों को इकट्ठा कीजिए। वहाँ हम सब इस रिपोर्ट पर चर्चा करें। सबकी राय लें। उसके अनुसार रिपोर्ट में आवश्यक परिवर्तन करें।

बोराडे : ठीक है बहनजी! क्या अब मैं जाऊँ?

बंसल : हाँ!

बोराडे : शिंदे!

शिंदे : क्या साहब?

बोराडे : वह फाइल लाइए तो जरा।

शिंदे : कौनसी फाइल?

बोराडे : उत्तर प्रदेश सरकार की भारतीय भाषा शिक्षण संबंधी (फाइल)।

शिंदे : वह मेरे पास नहीं है।

बोराडे : फिर किसके पास है?

शिंदे : कुलकर्णी के पास है।

बोराडे : ठीक है। आप जरा मेरे कमरे में आइए। इधर उधर मत जाइए।

शिंदे : काय साहेब?

बोराडे : बरं, तर शिंदे वीस तारखेला एक सभा बोलवा. आजच तुम्ही परिपत्रक पाठवा. विसरू नका.

शिंदे : कसली सभा? कुणाकुणाला बोलवू?

बोराडे : नेहमीचीच त्रैमासिक सभा. प्रशासनिक विभागातल्या सगळ्या कर्मचाऱ्यांना बोलवा.

शिंदे : कुठे ठरवू सभा? सभागृहात की सचिवांच्या खोलीत?

बोराडे : सभागृहात. तसंच सगळ्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी, अडचणी आणि काही सूचनाही मागवा.

शिंदे : ठीक आहे साहेब.

बोराडे : त्यांच्या तक्रारी ऐकूया. अडचणींचा विचार करूया. त्यांच्या सूचनांचा पण विचार करूया. आता तुम्ही कुळकर्णींना पाठवा.

शिंदे : क्या है साहब?

बोराडे : शिंदे। बीस तारीख को एक बैठक बुलाओ। आज ही तुम परिपत्र भेजो। भूलो मत।

शिंदे : कैसी बैठक? किस-किस को बुलाना है?

बोराडे : नियमित त्रैमासिक बैठक। प्रशासनिक विभाग के सभी कर्मचारियों को बुलाइए।

शिंदे : बैठक का आयोजन कहाँ करें? समिति-कक्ष में या सचिव महोदय के कमरे में?

बोराडे : समिति-कक्ष में। साथ ही सभी कर्मचारियों से शिकायतें, कठिनाइयाँ और कुछ सुझाव भी आमंत्रित कीजिए।

शिंदे : ठीक हैं साहब।

बोराडे : उनकी शिकायतें सुनें। कठिनाइयों पर विचार करें। उनके सुझावों पर भी विचार करें। अब तुम कुलकर्णी को भेजो।

शब्दार्थ

अहवाल	रिपोर्ट
बाजू	बाजू
नेहमीची	नियमित
त्रैमासिक	त्रैमासिक
सभा	बैठक
सर्व	सब, सारे
कर्मचारी	कर्मचारी
एकत्र	इकट्ठा
चर्चा	चर्चा
बदल	बदलाव/परिवर्तन
आता	अब
फाईल	फाइल
शिक्षणाबाबतची	शिक्षण संबंधी

माझ्याजवळ	मेरे पास
कोणाकडे	किसके पास
परिपत्रक	परिपत्र
पाठवा	भेजिए
कसली	कौनसी
कुणाकुणाला	किस-किस को
विभाग	भाग, विभाग
सगळ्या	सभी
तक्रारी	शिकायतें
अडचणी	कठिनाइयाँ
सूचना	सुझाव
मागवा	प्राप्त करना/ आमंत्रित करना
विचार	सोच, विचार
विचार करणे	विचार करना

अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) बंसलना कुठला अहवाळ हवा आहे?
2) वीस तारखेला कुठली सभा आहे?
3) उत्तरप्रदेश सरकारची भारतीय भाषा शिक्षणा बाबतची फाईल कुणाकडे आहे?
4) त्रैमासिक सभा कुठे आहे?

II उदाहरण के अनुसार प्रत्येक प्रश्न के एक-एक उत्तर दीजिए।

उदाहरण: तुम्हाला फक्त हेच पेन हवं आहे ना?
होय, मला फक्त हेच पेन हवं आहे.

1) तुम्हाला एकच बाहुली हवी आहे ना?
2) तुम्हाला हेच पुस्तक हवं आहे ना?
3) तुम्हाला हेच खाद्यपदार्थ हवे आहेत ना?

III उदाहरण के अनुसार प्रत्येक प्रश्न के दो-दो उत्तर दीजिए।

उदाहरण: तुम्हाला हेच अहवाल हवे आहेत का?
होय, मला हेच अहवाल हवे आहेत.
नाही, मला हे अहवाल नको आहेत.

1) तुम्हाला हेच तांदूळ हवे आहेत का?
2) तुम्हाला हेच पुस्तक हवे आहे का?

3) तुम्हाला हेच गहू हवे आहेत का?
4) तुम्हाला हेच फूल हवं आहे का?

IV उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों का परिवर्तन कीजिए।

1. *उदाहरण:* ही वही आहे. हया वह्या आहेत.
   1) ही खोली आहे. 2) ही बाहुली आहे.
   3) ही मिरची आहे. 4) ही मोहरी आहे.
2. *उदाहरण:* ती बहीण आहे. त्या बहिणी आहेत.
   1) ती पेन्सिल आहे. 2) ती फाईल आहे.
   3) ती भिंत आहे. 4) ती डाळ आहे.
3. *उदाहरण:* ती भाषा आहे. त्या भाषा आहेत.
   1) ती सभा आहे. 2) ती जागा आहे.
   3) ती शाळा आहे. 4) ती शिक्षिका आहे.
4. *उदाहरण:* तो खाद्यपदार्थ आहे. ते खाद्यपदार्थ आहेत.
   1) तो अहवाल आहे. 2) तो मित्र आहे.
   3) तो ग्राहक आहे. 4) तो शिक्षक आहे.
5. *उदाहरण:* ते घर आहे. ती घरं आहेत.
   1) ते सभागृह आहे. 2) ते टेबल आहे.
   3) ते गाव आहे. 4) ते पुस्तक आहे.

V उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए हिंदी शब्दों के समानार्थक मराठी शब्दों का प्रयोग कर वाक्यों की जोड़ियाँ बनाइए।

उदाहरण: पुस्तक वहीखाली आहे. वही ..... आहे. (पुस्तक के ऊपर)
वही पुस्तकावर आहे.

1) शाळा घरामागे आहे. घर ..... आहे. (स्कूल के सामने)
2) दुकान शाळेसमोर आहे. शाळा ..... आहे. (दुकान के पीछे)
3) पेन पुस्तकावर आहे. पुस्तक ..... आहे. (पेन के नीचे)
4) माझ्यापुढे गीता आहे. मी ..... आहे. (गीता के पीछे)
5) सभेपूर्वी चहापान आहे. चहापाना ..... सभा आहे. (के बाद)

VI उदाहरण के अनुसार वाक्यों का परिवर्तन कीजिए।

उदाहरण: तू त्या मुलाला बोलव. तुम्ही त्या मुलाला बोलवा.
1) तू त्या कमचाऱ्याला बोलव. 2) तू बहिणीला बोलव.
3) तू परिपत्रक पाठव. 4) तू इकडे ये.
5) तू चहा घे.

VII उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए शब्दों का प्रयोग कर नीचे दिए गए वाक्यों का विस्तार कीजिए।

उदाहरण: तुम्ही सभा बोलवा. (त्रैमासिक)
(नेहमीची)
(उद्या)

1) तुम्ही त्रैमासिक सभा बोलवा.
2) तुम्ही नेहमीची त्रैमासिक सभा बोलवा.
3) तुम्ही उद्या नेहमीची त्रैमासिक सभा बोलवा.

1) तुम्ही जमवा.
(एकत्र)
(कर्मचाऱ्यांना)
(सर्व)

2) आपण करूया.
(बदल)
(आवश्यक)
(अहवालात)

3) बोलवा.
(कर्मचाऱ्यांना)
(सगळ्या)
(विभागातल्या)
(आपल्या)

4) पाठवा.
(परिपत्रक)
(एक)
(आजच)

VIII उदाहरण के अनुसार दिए गए वाक्यों में उपयुक्त शब्द का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

उदाहरण: तो कर्मचारी आहे.
त्या कर्मचाऱ्याला बोलवा.

1) तो भाषेचा अहवाल आहे.
.... अहवालावर चर्चा आहे.
2) ते आपले सगळे कर्मचारी आहे.
.... कर्मचाऱ्यांना बोलवा.
3) हा माझा मित्र आहे.
.... मित्राचं नाव उमेश आहे.
4) ही मुलांची अभ्यासाची खोली आहे.
.... खोलीत पसारा आहे.
5) हे सुचेताचं अभ्यासाचं टेबल आहे.
.... टेबलावर पुस्तकं आहेत.

IX उदाहरण के अनुसार कोष्ठक में से उपयुक्त शब्द चुनकर दिए गए वाक्यों के प्रश्नवाचक वाक्य कीजिए।
(कोणती, कोणते, कोणतं, कोणाजवळ, कुणाला, कुणाकुणाला)

उदाहरण: ते पुस्तक सुचेताकडे आहे. ते पुस्तक कोणाकडे आहे?

1) हे पुस्तक भूगोलाचे आहे. 2) ही पटना मिरची आहे.

3) जोसेफला बोलवा. 4) सर्व कर्मचाऱ्यांना बोलवा.

5) ती बाहुली शांताजवळ आहे. 6) हे भाषेचे अहवाल आहेत.

X उदाहरण के अनुसार नीचे दिए गए वाक्यों के प्रश्न वाचक रूप बनाइए।

उदाहरण: बाईंना सामान दे. बाईंना सामान देऊ का?

1) उमेशला चहा दे. 2) ही मिठाई घे.

3) भूगोलाचं पुस्तक शोध. 4) आत या.

XI उदाहरण के अनुसार दिए गए जोड़ियों के दूसरे वाक्य पूरे कीजिए।

उदाहरण: रामू, ताईंना हे सामान दे.
आपण ताईंना हे सामान देऊया.

1) मावशी, तू चहा घे. मावशी, आपण चहा .....

2) उमेश, तू बस. उमेश, आपण .....

3) सुचेता, तू जेवण कर. सुचेता, आपण जेवण .....

4) बोराडे, तुम्ही चर्चा करा. बोराडे, आपण चर्चा .....

5) पुढील वर्षाच्या कार्यक्रमांवर विचार करा. आपण .....

6) सुधा, तू बाजारात जा. सुधा, आपण बाजारात .....

7) तुम्ही बटाटेवडे खा. आपण, बटाटेवडे .....

पढ़िए और समझिए।

सगळ्या सभा नेहमीसारख्याच! चेहरेही तेच, कामकाजही तेच, विषयपत्रिकाही तीच, गुळगुळीत झालेले शब्दही तेच आणि सभेचा विषयही तोच! 'प्रशासनात भारतीय भाषांच्या उपयोगाची प्रगती'. पण आजची सभा निराळी आहे. सचिवांना उत्साह आहे. भाषेमध्ये रस आहे. त्यांच्याजवळ कर्मचाऱ्यांच्या तक्रारींवर उपाय आहेत. पुढच्या वर्षासाठी योजना आहेत. त्यांचे एकच ध्येय आहे 'भारतीय भाषांतच प्रशासन हवे'. त्यासाठी त्यांच्याजवळ अनेक कार्यक्रम आहेत. सर्वांनाच उत्साह आहे. प्रयत्न करा. प्रगती शक्य आहे. "भारतीय भाषा जिंदाबाद!"

शब्दार्थ:

सगळ्या	सब
नेहमीसारख्याच	हमेशा की तरह
कामकाज	कामकाज
गुळगुळीत	गोलमोल, अस्पष्ट
झालेले	हुए

प्रगती	प्रगति
पण	पर, लेकिन
आजची	आज की
निराळी	निराली, अनोखी
सचिवांना	सचिव को
उत्साह	उत्साह
रस	रुचि
त्यांच्याजवळ	उनके पास
तक्रारींवर	शिकायतों पर
पुढच्या	अगले
योजना	योजना
एकच	एकही
ध्येय	लक्ष्य
भाषांतच	भाषाओं में
त्यासाठी	इसके बारे में
प्रयत्न	प्रयत्न
शक्य	संभव

अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) आजची सभा कशासाठी आहे?
2) वारंवार वापरल्याने शब्द कसे झाले आहेत असे म्हटले आहे?
3) सचिव कसे आहेत?
4) सचिवांचे ध्येय काय आहे?
5) लेखकाने शेवटी कोणती घोषणा दिली आहे?

II वार्तालाप और अनुच्छेद के आधारपर नीचे दिए गए वाक्य पूरे कीजिए।

1) हे भाषेबद्दलचे ..... आहेत.
2) अहवालात आवश्यक तो ..... करु.
3) प्रशासनिक ..... सगळ्या ..... बोलवा.
4) सगळ्या कर्मचाऱ्यांच्या ....., ..., ... मागवा.
5) गळगुळीत झालेले ..... तेच आणि सभेचा ..... तोच!

III पाठ में किन शब्दों के साथ नीचे दिए गए विशेषणों का प्रयोग किया गया है, बताइए।
त्रैमासिक, नवा, गुळगुळीत

IV नीचे दिए गए प्रत्येक शब्द समूह से उस शब्द को चुनकर बताइए जो उस वर्ग का न हो।

1) सूचना, सभा, भाषा, विभाग, योजना, स्पर्धा
2) उपाय, अहवाल, प्रगती, विषय, कार्यक्रम
3) मत, परिपत्र, उपदेश, कामकाज, रूप, राज्य
4) फाईल, शब्द, अडचण, तक्रार, बाग
5) ठेवा, घ्या, कर्मचारी, पाठवा, बोलवा, या

V प्रत्येक शब्दसमूह के कोष्ठक में दिए गए शब्दों से संबंध रखनेवाले शब्द/शब्दों को पहचानिए और बताइए।

1) मुलगा, गुळगुळीत, काळा, भुरभुरीत, पांढरा - (शब्द)
2) कर्मचारी, निळी, अडचणी, खेळ, त्रैमासिक, स्वस्त - (सभा)
3) गहू, फुले, योजना, बाग, अडचण - (भाषा)
4) मागणी, गहू, फूल, चिवडा, पिवळा - (कर्मचारी)

VI कोष्ठक में दिए गए हिंदी शब्दों के मराठी समानार्थी शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

1) तुम्हाला ..... काही हवं आहे का? (और)
2) आपण अहवालात आवश्यक तो ..... करूया. (बदलाव)
3) तीस ..... एक सभा बोलवा. (तारीख को)
4) प्रशासनिक विभागातल्या ..... कर्मचाऱ्यांना बोलवा. (सब)
5) ती फाईल ..... आहे? (किसके पास)

VII हिंदी में अनुवाद कीजिए।

आज शाळेत शिक्षक आणि पालकांची एक सभा आहे. ही सभा शाळेच्या सभागृहात आहे. सभेचा विषय आहे 'पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेणे.' या सभेत विद्यार्थ्यांना प्रवेश नाही. सभेला सगळे शिक्षक आणि पालक उपस्थित आहेत. पालकांच्या काही अडचणी, तक्रारी आणि सूचनाही आहेत. तरीही या सभेत गोंधळ व आरडाओरडा मात्र नाही. ही या वर्षातील शेवटचीच सभा आहे. सभेनंतर गरमागरम चहा, स्वादिष्ट बर्फी, चिवडा आणि पेढे आहेत.

VIII मराठी में अनुवाद कीजिए

आज दोपहर को कार्यालय में बैठक का आयोजन कीजिए। आज कर्मचारियों की बैठक है। अपनी माँगें, कठिनाइयाँ और सुझाव सचिव महोदय के सामने रखिए। सभा के बाद चाय का प्रबंध कीजिए। चाय के साथ मिठाई देना न भूलिए।

IX नीचे दिए गए शब्दों का वाक्यों में प्रयोग कीजिए।

अहवाल, फाईल, सभा, कर्मचारी, त्रैमासिक

X "कार्यालय में वार्तालाप" के बारे में एक छोटा सा अनुच्छेद मराठी में लिखिए।

टिप्पणियाँ

I इस पाठ में निम्न प्रकार के वाक्यों का परिचय दिया गया है।

1. *उदाहरण:*
   1) तिथं आपण या अहवालावर चर्चा करुया.
      (वहाँ हम सब इस रिपोर्ट पर चर्चा करें।)
   2) सर्वांची मतं घेऊया.
      (सब की राय लें।)
   3) त्याप्रमाणे अहवालात आवश्यक बदल करुया.
      (उसके अनुसार रिपोर्ट में आवश्यक परिवर्तन करें।)
2. *उदाहरण:*
   1) मला तो आजच हवा आहे. (मुझे वह आजही चाहिए।)
   2) तुम्हाला हाच हवा आहे ना? (आपको यही चाहिए न?)
   3) हाच हवा आहे मला. (यही चाहिए मुझे।)
   4) तुम्हाला आणखी काही हवं आहे का? (आपको कुछ और चाहिए क्या?)

उपर्युक्त उदाहरण (1.) के वाक्यों में रेखांकित क्रियारूप वक्ता और श्रोता दोनों मिलकर एक क्रिया करने का प्रस्ताव वक्ता करता है। मूल क्रियारूप से 'ऊ' प्रत्यय जोड़कर 'या' का प्रयोग कर ऐसे इच्छार्थक क्रियारूप बनते हैं।
मूल क्रिया + 'ऊ' प्रत्यय + 'या'
कर + ऊ + या = करुया (करें)
घे + ऊ + या = घेऊया (लें)

उदाहरण (2.) के वाक्यों में 'हवा आहे' 'चाहिए' वाले वाक्यों में सर्वनामों के साथ कर्मकारक 'ला' का प्रयोग दिखाया गया है।
विविध सर्वनामों के साथ 'ला' का प्रयोग निम्न प्रकार से होता है।

	एकवचन	*बहुवचन*
उत्तम पुरुष	मला (मुझे)	आम्हाला/आपल्याला (हमको)
मध्यम पुरुष	तुला (तुमको)	तुम्हाला/आपल्याला (आपको)
अन्य पुरुष	ह्याला/त्याला (इसको/ हिला/तिला उसको)	ह्यांना/त्यांना (इनको/उनको)

ह्याला/त्याला

ध्यान दें कि 'ला' का बहुवचन रूप 'ना' केवल अन्यपुरुष में प्रयुक्त होता है।

II मराठी में आकारान्त विशेषण के रूप हिंदी की ही तरह संज्ञा के लिंग वचन के अनुसार बदलते हैं।

1. *उदाहरण:*

	एकवचन	*बहुवचन*
पु.	गोरा मुलगा (गोरा लड़का)	गोरे मुलगे (गोरे लड़के)
स्त्री.	गोरी मुलगी (गोरी लड़की)	गोऱ्या मुली (गोरी लड़कियाँ)
नपुं.	गोरं मूल	गोरी मुलं

2. यदि संज्ञा में कोई विभक्ति लगे और उसका तिर्यक् रूप प्रयुक्त हो तो विशेषण के अन्त में सभी लिंग वचनों में 'या' लगता है।

उदाहरण:

	एकवचन	*बहुवचन*
पु.	गोऱ्या मुलाचा (गोरे लडके का)	गोऱ्या मुलांचा (गोरे लड़कों का)
स्त्री.	काळ्या मुलीचा (काली लड़की का)	काळ्या मुलींचा (काली लड़कियों का)
नपुं.	मोठ्या झाडाचा (बड़े पेड़ का)	मोठ्या झाडांचा (बड़े पेड़ों का)

3. उपर्युक्त नियम संकेतवाचक विशेषणों के लिए भी लागू होता है।

उदाहरण:

	एकवचन	*बहुवचन*
पु.	हा/तो	हे/ते
स्त्री.	ही/ती	ह्या/त्या
नपुं.	हे/ते	ही/ती

तिर्यक् रूप - ह्या/त्या

उदाहरण: हा मुलगा आहे. - यह लडका है।

ह्या मुलाजवळ वह्या आहेत. - इस लड़के के पास कापियाँ हैं।

4. शेष विशेषण शब्दों में लिंगवचन के अनुसार कोई परिवर्तन नहीं होता।

उदाहरण:

	एकवचन	*बहुवचन*
पु.	सुंदर मुलगा	सुंदर मुलगे
स्त्री.	सुंदर मुलगी	सुंदर मुली
नपुं.	सुंदर मूल	सुंदर मुलं

III किसी वस्तु या बात के विषय में सुनिश्चितता प्रकट करने के लिए हिंदी के समान मराठी में भी वाक्य के अन्त में 'न' या 'ना' लगाकर प्रश्न करते हैं।

उदाहरण: हा आंबेमोहोर तांदूळच आहे ना?/नं?
यह आंबेमोहोर चावल ही है ना?/न?

IV हिंदी 'के बारे में' 'बाबत' प्रयोगों के लिए मराठी में 'बाबत, बद्दल' 'साठी' ऐसे अव्ययों का प्रयोग होता है। ये अव्यय रूप संज्ञाओं तथा सर्वनामों के तिर्यक् रूपों से जोड़े जाते हैं।

उदाहरण:

1. शिकण्या + बाबत = शिकण्याबाबत - शिक्षण के बाबत
विद्यार्थ्यांना शिकण्याबाबात उत्साह हवा.
(विद्यार्थिओं में शिक्षण के बाबत उत्साह चाहिए।)
2. शिकण्या + बद्दल = शिकण्याबद्दल - शिक्षण के बाबत
प्रत्येकाला शिकण्याबद्दल उत्साह पाहिजे.
(हर एक में शिक्षण के बाबत उत्साह चाहिए।)
3. शिकण्या + साठी = शिकण्यासाठी - शिक्षण के लिए।
सर्वांना शिकण्यासाठी शाळा पाहिजे. (सब को शिक्षण के लिए स्कूल चाहिए।)
4. माझ्या + बाबत = माझ्याबाबत - मेरे बारे में
माझ्याबाबत तुला माहिती आहे का? (मेरे बारे में तुम्हें जानकारी है क्या?)
5. सभे + बद्दल = सभेबद्दल - सभा के बारे में/सभा के बाबत
सभेबद्दल विचार कर. (सभा के बारे में सोचो।) (सभा के बाबत सोचो.)

V प्रश्न वाचक सर्वनामों के तिर्यक रूपों की द्विरुक्ति में हिंदी के समान मराठी में भी विभक्ति प्रायः बाद वाले शब्द में लगती है।

उदाहरण:

कुणाला	-किसको
कुणाकुणाला	- किस किसको
कुणा कुणाला	- किस, किस का